# कवी यशवंत मनोहरांच्या कवितेतील निसर्गचित्रण

**प्रा. डॉ. प्रशांत रामदासजी राऊत**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग,
नूतन आदर्श महाविद्यालय उमरेड

---

प्रास्ताविक :

मराठी साहित्यविश्वामध्ये डॉ. यशवंत मनोहरांचे नाव सर्वपरिचित आहे. एक प्रतिभावंत विचारवंत आणि आंबेडकरवादी साहित्यिक या अंगानी त्यांचे व्यक्तित्व खुलून दिसणारे आहे. दलित साहित्याला आंबेडकरवादाची सैद्धांतिक भूमिका आपल्या लेखणीतून त्यांनी प्राप्त करून दिली. "दलित जाणिवेतून दलित जीवनविषयक जे सामाजिक निर्माण होते ते दलित साहित्य होय." आंबेडकरवाद विचारसरणीला पुढे नेणारे व नव्या जीवनवादी साहित्यशास्त्राची मांडणी करणारे साहित्य समीक्षक म्हणूनही ते सर्वांच्या परिचयाचे आहेत.

यशवंत मनोहर हे सर्वप्रथम इहवादी जाणिवेचे एक आधुनिक कवी आहेत. व नंतर ते समीक्षक, कादंबरीकार आणि वैचारिक निबंधकार आहेत. चार्वाक, मार्क्स, बुद्ध, फुले, आगरकर आणि आंबेडकर यांच्या साहित्याच्या विचारसरणीने जागृत झालेले त्यांचे व्यक्तित्व आहे. साहित्यक्षेत्रातील अनेक पुरस्कार त्यांनी पटकावले असून अनेक साहित्य सम्मेलनांची अध्यक्षपदेही त्यांनी भूषविली आहेत. कवितेच्या क्षेत्रात त्यांनी आपली नाममुद्रा उमटविली असून महाराष्ट्रात एक मोठा वाचक वर्ग निर्माण केला आहे. डॉ. यशवंत मनोहर हे प्रखर आंबेडकरवादी व्यक्तित्व आहे. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिदर्शन आणि विचारदर्शन घडविणारी सामर्थ्यशाली आणि सौंदर्यशाली कविता लिहिली. मनोहरांच्या कवितेतील शब्दकळा आणि प्रतिमासृष्टी वाचकाला मोहित करते आणि त्यांनी शब्दांनी चितारलेली ही सृष्टी त्यांच्या प्रतिभाशक्तीची ग्वाही देते. आंबेडकरवादी साहित्यशास्त्राचा आणि जीवनशास्त्राचा व्यावहारिक तोट्यांची चिंता न करता ते नेटाने पाठपुरावा करीत असून आंबेडकरवादी व्यक्तित्वाचा ते एक सर्वस्वी अचूक आणि प्रखर नमुना आहेत.

**मनोहरांच्या कवितेतील निसर्गचित्रण :**

मनोहरांच्या प्रगल्भ वैचारिकतेला व चिंतनशीलतेला येथे नवनवे धुमारे फुटलेले आहेत. या त्रिपदीमधून कवी म्हणतो-

बंधो ! पानगळ सांगते वसंत येतोच आहे
ओहोटी म्हणतेय भरती माझ्या मागेच आहे
रोजच सांगतो सूर्यास्त : सुर्य घरून निघाला आहे (जीवनापन ५७)

बंधो ! राखेत पुन्हा उड्डाणाची रोपे उगवतात
वणव्यात जळालेली झाडे पुन्हा हिरव्या हाका होतात
जगणे अडवणारे बांध फक्त फुटण्यासाठीच असतात

(जीवनायन पृ. ५७)

कवीचा भविष्यगर्भी आशावाद निसर्ग प्रतिमांच्याद्वारे इथे मोठ्या सूचकपणे व्यक्त होतो. मनोहरांचे जीवनचिंतन हे अत्यंत आश्वासक स्वरूपाचे आहे कवी म्हणतो -

बंधो ! हा ग्रहणकालातील अंधार चिरंतन नसतोय हे खरे
की अधुनमधुन मने मोडतात आणि जळत बसतात.
तरी दोन श्वासांमधील अंतर म्हणे पूर्णविराम नसतो (जीवनायन पृ. ६५)

असे म्हणतांना कवी नवसमाजनिर्मितीक्षम आशेची लागवड वंचिताच्या तना-मनात करतात. वैचारिक आशयाची काव्यात्मता त्यांच्या या त्रिपदीमधून उत्तम प्रकारे अविष्कृत होतांना दिसते. कवीची काही स्फुटे ही याच धरतीची आहे कवी म्हणतो.

जखमा बांधून चालतांना दुःखाचेही सुख यासाठी की
अंधारातून जावे लागत असले तरी अंधार हे या काफिल्याचे ध्येय नाही
(जीवनायन पृ. ६९)

अशो आर्त भावना कवी बोलून जातो. चिंतनशील कवितेबरोबरच मनोहरांनी या संग्रहात वैशिष्ट्यपूर्व भावकवितांचे लेखन केले आहे. त्यांची ही भावसंपन्न कविता नितांत रमणीय आहे.

‘पाऊस सांगेल कदाचित’, ‘आम्ही’, ‘तुझी आठवण झाली’, ‘सूर्यचंद्राचे झुंबर’, ‘आयुष्य’, ‘जळता प्रवाह’, ‘माती पेटावी एकमेकांशिवाय’, ‘मी मुक्त झालो आहे’, ‘कळत नाही’ इत्यादी अनेक भावसंपन्न कविता या संग्रहात आलेल्या आहेत. या कवितांमधून मनोहरांच्या सौंदर्यपूर्ण व भावविभोर व्यक्तिमत्वाचे सुरेख दर्शन घडते. ‘उत्थानगुंफेतील भावसंपन्नता’ ‘जीवनायन’ मध्ये अधिक धनगर्द व संयत झालेली दिसते. या भावकवितेमधून मनोहरांनी केलेला आत्माविष्कार मोठा विश्रब्ध दिसून येतो. हळव्या भावकोमल संवेदनाचे रेखाटन कराणरी त्यांची ही कविता आहे. कवी म्हणतो

एकमेकांशिवाय असतो आपण केवळ पानगळ झालेली झाडे
आपण असतो केवळ एकमेकांच्या वाटेवर अंधरलेली आसवे ओहोटून गेलेल्या समुद्राइतकेच आपण ओसाड असतो, एकमेकांशिवाय आपण केवळ
नावा असलेली शिडे असतो (जीवनायन पृ. ४२)

या कवितेत कवी आपल्या भावूक व संवेदनशील मनाला वाचकांसमोर अंथरतात. हृदय जाळणारी भावकाव्यात्मता येथे होते. प्राकृतिक प्रतिमासृष्टीशी विशेष जवळीक असलेले कवी समाजजीवनाचे रेखाटन करताना निसर्ग प्रतिमांचा सफाईदारपणे वापर करतात. पण प्रत्यक्ष निसर्गाचेच रेखाटन करायचे असेल तर मग मनोहरांच्या प्रतिभेला अक्षरशः बहर येतो. यासंदर्भात कवीच्या पावसावरील कवितांचा उल्लेख करता येईल कवी म्हणतो -

पाऊस : करपलेल्या श्वासात नवी क्षितिजे पेरणाऱ्या आईच्या हातासारखा
पाऊस : निखाऱ्यांच्या मध भरवणाऱ्या प्रियेच्या कासावीस आवेगासारखा

पाऊस : सर्जनशील उत्तर पाषाणप्रश्न जन्माला घालणारे
पाऊस : अश्रूचा आरंभ आणि सौंदर्य अश्रूच्या
(जीवनायन पृ. १०)
खूपदा विचार छळतो पाऊस कधी कधी माणसांसारखा का वागतो
खूपदा हैराण होतो पाऊस मध्येच मंबाजीसारखा का वाटतो
कधी वाटते पाऊस दुःखाच्या डोळ्यांतील आसवांची वाणी आहे
कधी वाटते कवीच्या फुटलेल्या काळजांची ती रडणारी कहाणी आहे.
(जीवनायन पृ. ११)

पावसाचे नवे संदर्भ कवीने येथे प्रगट केले आहे. मनोहरांची ही भावसंपन्नता व इतर कलावादी कवीप्रमाणे नाही हे लक्षात घेतले पाहिजे. मूल्यनिष्ठ जीवन जाणिवातून तितकीच नित्यनूतन व मौखिक प्रतिमा निर्मिती होत असते हे इथे स्पष्ट होते. मनोहरांचे कवित्व हे अभिजात सौंदर्यवादी आशय मांडण्याची प्रचंड क्षमता असलेले कवित्व आहे. भावकवितेच्या संदर्भात मनोहर मनःपूत आहेत. मनात आणले तर कलावाद्यांना व सौंदर्यवाद्यांना हालविणाऱ्या कविता ते सहजपणे लिहू शकतात. एवढे सामर्थ्य त्यांच्या भावकवितेत नक्कीच आहे.

'जीवनायन' मधून प्रगटणारे विचार अभिनव आहेत. 'जीवनायन' हे मनोहरांचे विचारकाव्य आहे ते त्यांचे चिंतनकाव्य आहे." असे रा.ग. जाधव म्हणतात.

कवी डॉ. यशवंत मनोहर हे अन्याय, अत्याचार विषमतेशी लढा देतांना परिवर्तनाचे व त्याचे पक्षधर होऊन उधाणून जातात. कवीचीही उर्जा युगांतराचे गाणे ठरते. परिवर्तन हेच कवीचे काव्यरूप ठरते. काव्यरूप झालेल्या शब्दातून कवी स्वतच्या प्रकाशाचा सारांश व्यक्त करतात. जीवनात आलेले दुःखभोग आणि कविता यांचे अभिन्न नाते कवी मांडतांना म्हणतात -

दुःखातून येती शब्द अश्रुतून येतो नाद ! येते सुसार कविता
जसे घावातून रक्त (जीवनायन पृ. ३६)
दुःखाश्रू आणि काव्यत्व हे या कवितेमध्ये एकरूप होते. अगदी अनवरपणे अश्रू काव्यधारेचे रूप घेतात.
मी बांधत नाही शब्दात अश्रू इथे अश्रूच होतात माझी कविता
मी गाणे गात नाही दुःखाचे इथे दुःखेच गातात माझी कविता
जीवनायन पृ. ६९)

जमिनीतून येणाऱ्या लाव्हयाप्रमाणे काव्य कवीची जिव्हा होते. कविचे दुःख त्यांचे अश्रू हे काही वैयक्तिक दुःखानुभव नसतात. काही आसवे दुसऱ्यांच्या आसवांसाठी दुःखू लागतात. ही खुद माणूसपणाची जाणीव कवीत पुरेपूर भरलेली आहे. आणि ती व्यक्त करतांना कवी म्हणतो.

तिमिरकुलाशी भांडावा दिप तसा शूर माणूस हवा मानव
मी 'मानव' म्हणणारा सर्वप्रकाशक सूर्य हवा सकलांमध्ये
स्वतःस पाहून गहिवरणारा तळा हवा

फोडासम साजिवांना जपतो इतका माणूस खूळ हवा (जीवनायन पृ. ८७)

अशी मानवाप्रतीची अथांग बुध्दामयी करूणा डॉ. यशवतं मनोहर 'जीवनायन' मधल्या कवितेत विसर्जित करतात. जडवादी इहवादी, बुध्दीप्रामाण्यवादी तत्वज्ञान आणि कवीचे अनुभवविश्व यांच्यात कुठेही अंत विरोधाला थारा नाही. धर्माधता, ईश्वरवाद, वर्णव्यवस्था मानवी भेद जोपासणारे धर्मग्रंथ, पुनर्जन्म, स्वर्गनरकाच्या मानवी बुध्दी कुंठीत भ्रामक कल्पना, अध्यात्म कर्मविपाक भेदवादी सिध्दांत डॉ. यशवंत मनोहरांनी तपशिलासह नाकारले आहे. हा एक मानस वैचारिक विद्रोह आणि संघर्ष असतो हा विद्रोह एकाचवेळी आपल्या परंपरागत श्रध्दाळू मनाशी असतो आणि त्याचवेळी सर्व सनातनी घटितांशी आणि अवैज्ञानिक युक्तीवादाशी असते.

निष्कर्ष :

मनोहरांच्या कवितेची आशय वैशिष्ट्ये पाहतांना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की यातील जिवंत अनुभवांना प्रतिभाविलासाशी कर्तव्य नाही. त्यामुळे या कवितेचा अलंकार, उपमा, उपमेयांच्या चौकटीत न अडकता साध्या सरळ शैलीत आविष्कार झालेला आहे. परंतु तरीही कुठे-कुठे प्रतिमांची गर्दी त्यांच्या कवितेत जास्त आढळल्याचे जाणवते व आशय हरविल्याची शंका येते. या कवितेमागे निश्चित विचार व परखड सत्य असल्याने ती काही वेळा आवाहानात्मक सूर धारण करते. शब्दांचे महत्व कवीला पटलेले आहे. प्रसंगी या शब्दांच्या उच्चारवैशिष्ट्यांतून पारंपारीक समाजव्यवस्थेविरूध्दची चिड, संताप, विद्रोह व्यक्त होतो. त्यामुळे त्यांच्या अनेक कवितात एक जोरकसपणा व धारदारपणा आल्याचे दिसते. म्हणूनच कवीचा आत्मविश्वास, उज्ज्वल भविष्याबद्दलचा आशावाद, त्यांच्या शब्दाशब्दातून व्यक्त होणारी आक्रमकता मनावर ठसते. म्हणूनच कवीची मानवमुक्तीची निष्ठा व नव्या माणसांच्या निर्भय जीवनावरील श्रध्दा व्यक्त करणारी त्यांची कविता दलित कवितेतील एक महत्वाच्या टप्पा ठरते.

सोबतच कवी यशवंत मनोहर यांच्या कवितेत निसर्गचित्रण आहे हेही दिसते. जागोजागी निसर्गाच्या प्रतिमांमधून ते व्यक्त होताना दिसतात. या कवीच्या कवितेत विद्रोह आहे पण त्यासोबतच निसर्गहि दडला आहे हे वरील विवेचनातून कळते. यशवंत मनोहर यांच्या कवितेचे हे वेगळेपण मान्य करावे लागते.

संदर्भ ग्रंथ :


- राजा ढाले- ‘अस्मितादर्श’ लेखक वाचक मेळावा भाषण १५-१-७८.
- सुहास पळशीकर (संपादकीय) साना वर्षारंभ विशेषांक ऑ. २००२ पुणे
- अर्जुन डांगळे दलित विद्रोह, लोकवाङ्मय गृह, मुंबई दु.आ., १९९८
- केशव मेश्राम आजचे दलित साहित्य ‘अस्मितादर्श’ दिवाळीअंक १९७७
- बाबूराव बागूल परिशिष्ट, ‘उत्थानगुंफा’, आ.र. पुणे १९८०
- यशवंत मनोहर - फुले आणि साहित्य सम्मेलन २००१, अध्यक्षीय भाषण.
- म.सु. पाटील दलित कविता, लोकवाडमयगृह मुंबई, १९८१
- डॉ. प्रमोद मुनघाटे – ‘आकांक्षा’ कवी वामन निंबाळकर विशेषांक, मार्च २००३